04 APR 2023

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक हितावर शिक्षकांनी सरकारला मार्गदर्शन करावे

## प्रा. सुखदेव थोरात यांचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर** : आपल्या संपादित ज्ञानाच्या आधारे सरकारला व्यापक सामाजिक हिताच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करणे शिक्षकांची जबाबदारी आहे. ती त्यांनी निर्भयपणे निभावली पाहिजे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी व्यवस्थापक प्रा. सुखदेव थोरात यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पहिला 'प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार-२०२३' प्रा. थोरात यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा. थोरात बोलत होते. ते म्हणाले, डॉ. पाटील यांच्या जीवनकार्यापासून एक धडा शिक्षकांनी अवश्य घ्यायला हवा, तो म्हणजे ज्ञानसंपादनाचा आणि ते समाजाला वाटण्याचा. वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्तिस्वातंत्र्यावर, लेखनावर, अभिव्यक्तीवर मर्यादा येत असतात; परंतु अशा काळातही शिक्षकांनी आपली समाजशिक्षकाची भूमिका सोडता कामा नये.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. जे. एफ. पाटील यांनी समाजाशी निगडित विविध प्रश्नांवर धाडसी आणि चिंतनपूर्ण मांडणी केली. समाजाशी जोडला गेलेला एक अर्थतज्ज्ञ असे त्यांचे वर्णन करावे लागेल. डॉ. विद्या कट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रा. थोरात यांचा परिचय करून दिला. अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे यांनी मानपत्राचे वाचन केले. शीतल माने यांनी सूत्रसंचालन केले, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. जे. एफ. पाटील यांच्या पत्नी कमल पाटील, कुटुंबीय, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे उपस्थित होते.




पहिला डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. सुखदेव थोरात यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

04 APR 2023

जनसंपर्क कक्ष

पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी सहभागी होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघासमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

# आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी विद्यापीठाचा संघ रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड झाली असून, संघ रवाना झाला आहे.

युवा महोत्सव ६ ते ८ एप्रिल या कालावधीत लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा (पंजाब) येथे होत आहे. महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठ संघातील लोकनृत्य व लोकवाद्यवृंद कलाप्रकारांची निवड झाली आहे. निवडीचे पत्र विद्यार्थी विकास विभागास प्राप्त झाले आहे. महोत्सवात विद्यापीठाचा २६ सदस्यांचा संघ सहभागी होणार आहे. युवा महोत्सवाच्या ३६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच लोकनृत्य 'ढोलू कुनिथा' व लोकवाद्यवृंद हे कलाप्रकार पात्र झाले आहेत. संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे मा. संचालक, विद्यार्थी विकास डॉ. पी. टी. गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

तरूण भारत

# आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी विद्यापीठाचा संघ रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संघाची आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवसाठी निवड झाली आहे. पंजाब येथील फगवाडामधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीत ६ ते ८ एप्रिल या कालावधीत आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव होणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ सोमवारी पंजाबला रवाना झाला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

फेब्रुवारी महिन्यात बेंगलोर येथील जैन युनिव्हर्सिटीत झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघ सहभागी झाला होता. या युवा महोत्सवात सहभागी ३५ विद्यार्थ्यांनी २५ सुवर्णपदके व ९ रौप्यपदके पटकावली. ६ ते ८ एप्रिल या कालावधीत पंजाबमधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीत आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव होणार आहे. आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचे २६ विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यापीठाचा संघ सोमवारी पंजाबला रवाना झाला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.



युवामहोत्सवासाठी रवाना झालेला संघ. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड आदी.

04 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. प्रकाश बिलावर यांचा 'मुक्ला'च्या पुरस्काराने सन्मान




नाशिक : डॉ. प्रकाश बिलावर यांना पुरस्कार प्रदान करताना प्रशांत पाटील, मुक्लाचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे व अन्य पदाधिकारी.

कोल्हापूर : महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँड कॉलेज लायब्ररीयन्स असोशिएशन (मुक्ला) मार्फत स्वर्गीय पांडुरंगजी नाल्हे स्मृतीप्रीत्यर्थ उत्कृष्ट संशोधन लेख पुरस्कार दरवर्षी दिला जातो. यावर्षीचा उत्कृष्ट संशोधन लेख पुरस्काराने शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांना सन्मानित करण्यात आले. मुक्ला व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेक्शनल कौन्सिल यांच्यातर्फे नाशिक येथे झालेल्या संघटनेच्या सहाव्या राष्ट्रीय परिषदेमध्ये हा पुरस्कार डॉ. बिलावर यांना महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय कार्यालय, ठाणे येथील प्रशांत पाटील यांच्या हस्ते यांच्या हस्ते आणि मुक्लाचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपस्थितीत प्रदान करण्यात आला. अक्षर वाङ्मय या युजीसी केअर यादीतील संशोधन पत्रिकेत प्रकाशित झालेल्या "युज ऑफ ओपन रिसोर्सेस बाय दि युनिव्हर्सिटी स्टुडंट्स: अ स्टडी' या त्यांच्या लेखाची निवड समितीने उत्कृष्ट संशोधन लेख म्हणून शिफारस केली. त्यांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. धनंजय सुतार यांनी अभिनंदन केले आहे.

04 APR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासन देतेय जैन तत्त्वज्ञानातील आरोग्याची गुरुकिल्ली

## शिवाजी विद्यापीठातील महावीर अध्यासनात संशोधनावर भर

कोल्हापूर : अनुराधा कदम

**समतोल आहार, आहार घेण्याची योग्य वेळ, आहार आणि झोप यातील अंतर, ऋतुमानानुसार आहारात पोषणमूल्यांचा समावेश याचे महत्त्व प्रत्येकाला गेल्या तीन वर्षांतील कोरोना काळाने शिकवले; पण आहाराचे हेच सूत्र गेल्या पिढ्यान्‌पिढ्या जपणाऱ्या जैन तत्त्वज्ञानातील आरोग्याची गुरुकिल्ली देण्याचे संशोधनात्मक काम शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या माध्यमातून होत आहे. सध्या १९ विद्यार्थी जैन तत्त्वज्ञानावर आधारित संशोधनावर भर देत समाजाच्या आरोग्यासाठी भरीव योगदान देत आहेत.**



जैन धर्मातील तत्त्वज्ञानाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास व्हावा, संशोधन व्हावे यासाठी २००५ साली भगवान महावीर यांच्या अडीच हजाराव्या जयंतीनिमित्ताने शिवाजी विद्यापीठात भगवान महावीर अध्यासनाची स्थापना करण्यात आली. यासाठी स्वतंत्र जागा दिली. महावीर यांच्या सामाजिक, राजकीय व धार्मिक विचारांचा लोकांमध्ये प्रसार करणे, तसेच जैनॉलॉजीचे अभ्यासक्रम सुरू करणे, यासाठी या अध्यासनाचे काम सुरू झाले. गेल्या १८ वर्षांपासून हा विभाग कार्यरत आहे. या अध्यासनात जैन धर्माचा परिचय, जैन साहित्य, इतिहास, जैनधर्मीयांची नैतिक शिस्त या विषयावर अभ्यास व संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. याबरोबरच प्राचीन भूजपत्रावरील लेखनाचे संकलन करण्याचे काम गतीने सुरू आहे. देशभरातील जैन लेखक, संशोधकांची सूची तयार करण्यात आली आहे. आजपर्यंत या अध्यासनातर्फे जैन तत्त्वज्ञानाची माहिती देणाऱ्या कार्यशाळा, चर्चासत्रे यासह ४० पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. अध्यासनाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या पुढाकाराने २४ तीर्थंकरांचा परिचय ग्रंथ प्रकाशित केला असून यामध्ये जैन धर्मातील ७० टक्के स्त्रियांचे योगदान आहे.

कोरोना काळात आहाराचे महत्त्व समजलेल्या प्रत्येकाचे लक्ष जैन धर्मातील आहार व्यवस्थापनाने वेधून घेतले आहे. जैन समाजातील लोकांचे जीवन जगण्याचे तंत्र, सवयी यामुळे आरोग्याची गुरुकिल्ली मिळते. याच विषयावर सध्या विद्यापीठाच्या अध्यासनाद्वारे सखोल संशोधनावर भर देण्यात येत आहे.

### काय आहे संशोधन ?

जैन धर्मातील अनेक लोक आजही सूर्यास्तापूर्वी अन्नसेवन करतात. त्यांच्या आहारात पोषकमूल्य असलेले पदार्थ असतात. पदार्थ भाजून तो शिजवण्यावर भर दिल्याने तो हलका होतो, जेणेकरून पचायला सोपे होते, हे तंत्र त्यांच्या आहाराचा पाया आहे. जेवणाची वेळ आणि झोपण्याची वेळ यामध्ये किमान तीन तासांचे अंतर ठेवल्याने आहाराचे योग्य पचन होते. याचे आचरण जैनधर्मीय आवर्जून करतात. सध्याच्या काळात जैन धर्मातील आहाराचे नियोजन, आहाराची वेळ, आहारातील पदार्थ यातून आरोग्य कसे चांगले राहू शकते यावर विद्यार्थ्यांकडून होणारे संशोधन समाजासाठी उपयुक्त ठरत आहे.

### इमारत निधीसाठी अध्यासनाचे प्रयत्न सुरूच

शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या जागेत लवकरच या अध्यासनाची इमारत उभी करण्याचे नियोजित आहे. यासाठी समाजातून देणगीमूल्यापोटी ३० लाख रुपये जमा झाले आहेत. एकूण अपेक्षित खर्च ७ कोटी असून, देणगीतून एक कोटीचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर इमारत बांधकाम सुरू होणार आहे. स्थापनेवेळी तत्कालीन राज्य सरकारतर्फे २५ लाखांचा निधी दिला आहे; मात्र त्यानंतर सरकारकडून आर्थिक बळ मिळाले नसल्याने देणगीसाठी अध्यासनातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

"

महावीर अध्यासनाच्या माध्यमातून भविष्यात खूप भरीव काम करायचे आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. स्थापनेवेळी राज्य सरकारने तीन कोटी रुपये निधी स्वरूपात देण्याचे आश्वासन दिले होते. अद्याप या निधीसंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यासाठी सध्याच्या सरकारने आर्थिक मदतीसाठी सहकार्य करण्याची गरज आहे.

**– डॉ. विजय ककडे**
अधिव्याख्याते, भगवान महावीर अध्यासन, शिवाजी विद्यापीठ

लोकमत

# कपिल पिसे शिवाजी विद्यापीठात प्रथम

आजरा : शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या नाट्यशास्त्र डिप्लोमामध्ये आजऱ्यातील कपिल पिसे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. त्याने यापूर्वी जिल्हा व राज्यस्तरीय अनेक पुरस्कार मिळविले आहेत. राज्य बालनाट्य स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून कपिल पिसेंनी काम केले आहे. विद्यापीठात नाट्यशास्त्र डिप्लोमामध्ये त्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
04 APR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे ३४४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत सोमवारी एम.कॉम., आयटी, एमए. . अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. आजअखेर ३४४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बी.कॉम., बी.एस्सी., बीए., बी.टेक., बीएस्सी. (संगणकशास्त्र), एम.ए., एमएस्सी (डिप्लोमा इन टॅक्सेशन) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# कॉलेज ऑफ फार्मसीला विजेतेपद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अग्रणी फार्मसी महाविद्यालय योजनेंतर्गत केशवराव भोसले नाट्यगृहात झालेल्या 'फार्माकरडंक' सांस्कृतिक स्पर्धेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतेपद मिळविले. स्पर्धेचे संयोजन शिवाजी विद्यापीठ, फार्मसी विभागीय कॉलेज यांनी केले होते. बॅले (नृत्यनाटिका), नृत्य (सोलो, सांघिक), नाटक, लघुनाटिका, मूकनाट्य, गायन, वाद्यवादन, फॅशन शो, चित्रकला, रांगोळी, फ्लॉवर अरेंजमेंट, कोलाज, पोस्टर पेंटिंग, लेखन या प्रकारांचा समावेश केला होता. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १५ फार्मसी महाविद्यालयांच्या पाचशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सांघिक स्पर्धेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतेपद मिळवले तर वैयक्तिक स्पर्धेत अपुर्वा साळुंखे (उत्कृष्ट अभिनेत्री), सांघिक यामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. सर्व स्पर्धकांना सांस्कृतिक विभागप्रमुख एस. एस. पाटील, दिग्दर्शक सुदर्शन खोत यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, उपप्राचार्य डॉ. एन. आर. जाधव यांनी अभिनंदन केले.